# बीड शहरातील मटका अड्ड्याचे ठिकाण वाचा उद्याच्या अंकात!
# अड्ड्याच्या ठिकाणाची यादी पोलीस अधीक्षकांकडे जाणार?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २३३ ■ सोमवार दि.१२ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 233 ■ Monday Dt.12 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# एसपी नवनीत कॉवत यांच्या कारवाया कौतुकास्पद परंतु खालच्या यंत्रणेमुळे अवैध धंदे पुन्हा बोकाळले?

## बीड शहरात कायद्याचे की गुंडांचे राज्य, पोलिसांच्या नाकावर टिच्चून मटका सुरू?

■ शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड शहर पोलीस ठाणे आणि ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका राजरोसपणे सुरू?
■ पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुखांच्या रायटरकडून मटका माफियांकडून वसुलीची चर्चा?

■ बीड एलसीबीची कारवाई का थंडावली; अनेक एलसीबीचे कर्मचारी मटका माफीयांच्या संपर्कात?
■ शहरातील प्रमुख चौकात चौकात व नामांकित गल्लीबोळात मटक्याचे बुके राजवस्तरणे चालू?

■ कोट्यवधी रुपयांच्या मटक्याची उलाढाल आणि लाखोचा हप्ता पोलिसांच्या खिशात?
■ शहरातील मटका अड्ड्यांविरोधात पोलिसांच्या कारवाईचे केवळ फार्सच ठरणार का?

■ बीड शहरातील अवैध धंदे बंद होतील अशी अपेक्षा नागरिकांना होती मात्र तसे होताना दिसत नाही?

**अवैध धंदे जोरात?**
बीड शहरात सध्या सर्व अवैध व्यवसाय सुरू असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. मात्र अवैध धंदा करणार्यावर धाक बसेना. सध्या तर बंद झालेल्या मटका टपर्या पुन्हा सुरू झाल्या असून, प्रत्येक ठिकाणी मटक्याच्या आकड्यांच्या पाट्या लावल्या जात आहेत. यांच्यावर पोलिस का कारवाई करत नाहीत? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बीड । प्रतिनिधी
बीड शहरातील चौकाचौकात अनेक ठिकाणी पोलिसांच्या नाकावर टिच्चून मटका जुगार सह अनेक अवैध धंदे फोफावले आहेत. या अवैध धंद्यातून पोलिसांना मोठी कमाई मिळत असल्याने हे अवैध धंदे बंद केले जात नाहीत असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. सध्याच्या परिस्थितीत बीड जिल्ह्यात गुंडागिरीचे प्रमाण वाढत चालले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व अवैध धंदे बंद असायला हवेत पण एकाही अवैध धंद्या विरोधात पोलिसांकडून कारवाई होतांना दिसुन येत नाही. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या कारवाया कौतुकास्पद आहेत परंतु खालच्या यंत्रणेचे दुर्लक्ष असल्यामुळे अवैध धंद्यानी डोके वर काढल्याचे चित्र दिसुन येत आहे. नवनीत कॉवत बीडला आल्यापासुन त्यांनी कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि जिल्ह्यातील सर्व अवैध धंदे बंद करण्यासाठी विशेष काही प्रयत्न केल्याचे दिसुन आले, तसेच पूर्णपणे अवैध धंदे बंद करण्यात त्यांना यश देखील आले. परंतु आता पुन्हा अवैध धंदे सुरू झाले असल्याचे दिसून येत आहे. याकडे पोलीस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.
विशेष म्हणजे शिवाजीनगर पोलीस ठाणे, बीड शहर पोलीस ठाणे आणि ग्रामीण पोलीस ठाणे या पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मटका









चालवणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. जलद पैसा मिळविण्याच्या नादात तरुणाई अवैध मटका जुगाराच्या आहारी जाऊ लागली आहेत. अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. तरुणांसह कामगार, रोजनदारीवर काम करणारा छोटा मजूर वर्गात व्यसनाधिनता वाढत आहे. याकडे संबंधित पोलीस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्यामुळे मटका जुगार चालवणाऱ्यांसह अनेक अवैध धंदे करणाऱ्यांना पाठबळ मिळत आहे. बीड शहरात मटका जुगार चालवणाऱ्यांवर पोलीस प्रशासन कारवाई करण्याची हिम्मत दाखवणार का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. बीड शहरात मटका चालवणारे हिम्मत दाखवत आहेत परंतु पोलीस प्रशासन हिम्मत दाखवत नाही. पोलीस प्रशासन कारवाई करण्याची हिम्मत का? करत नाही. यामधून मलिंदा मिळत असावा यामुळेच पोलीस प्रशासन कारवाई करत नसावी अशी देखील

► पान ४ वर

## जिल्हापरिषद शिक्षण विभागाने दिले परमेश्वर नेपते यांच्या चौकशीचे आदेश

**२८ मार्च २००५ या शासन निर्णयानुसार नेपते यांना तिसरे अपत्य**

धारूर । प्रतिनिधी
धारूर येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय हे सतत चर्चेत असते. धारूर तालुक्यातील जामदेववस्ती केंद्र अंजनडोह येथील जि.प. शिक्षक परमेश्वर नेपते यांनी २८ मे २००५ च्या शासन निर्णयानुसार २०१४ पासून शासन निर्णयाचे उल्लंघन केले असल्याने नेपते यांना तिसरे आपत्य असल्याने किल्ले धारूर येथील रोहन नखाते यांनी २८ एप्रिल २०२५ रोजी जि.प.बीड येथे शिक्षण विभागाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. धारूर तालुक्यातील जामदेववस्ती केंद्र अंजडोह येथील जि.प. शिक्षक परमेश्वर नेपते यांना २८/०३/२००५ नंतर या शासन निर्णयानुसार तिसरे अपत्य आहे व सन २०१४ साली शासकीय सेवेत शिक्षक म्हणून रुजू झालेले आहेत. संबंधित शिक्षक कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले असून शासनापासून माहिती लपवणे व शासनाच्या सेवेचा लाभ घेणे इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.
तरी संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने शासन निर्णयातील तरतुदीनुसार चौकशी करून चौकशी अहवाल आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सात दिवसाच्या आत कार्यालय सादर करावे असा आदेश शिक्षणाधिकारी यांनी दिलेला आहे. तरी जि.प शिक्षण विभाग (प्रा) काय कार्यवाही करते? याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

## सरपंच अपात्रतेचे आदेश रद्द

### शिवसेना माजी जिल्हाप्रमुख संजय साडेगावकर यांचे अपील मंजूर

बीड । प्रतिनिधी
वालूर तालुका सेलू जिल्हा परभणी येथील सरपंच व शिवसेना माजी जिल्हाप्रमुख संजय साडेगावकर यांना परभणी जिल्हाधिकारी यांनी अपात्र केले होते सदरील अपात्रतेचे आदेश माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी रद्द करून अपील मंजूर केले व संजय साडेगावकर यांना सरपंच पदी कायम केले.



प्रकरणाची सविस्तर हकीकत अशी की सरपंच संजय साडेगावकर व त्यांच्या पत्नी सदस्य महानंदा साडेगावकर यांच्या विरोधात गावातील राजकीय विरोधक असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांनी कलम १४ ज एक महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम नुसार माननीय जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे तक्रार दाखल करून विनंती केली की सरपंच संजय साडेगावकर व त्यांच्या पत्नी महानंदा साडेगावकर व त्यांच्या आई कौशल्याबाई साडेगावकर यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे व त्यांच्या बऱ्याचशा प्रॉपर्टी मालमत्ता ह्या शासकीय जमिनीवर ती अतिक्रमण करून उभा राहिलेल्या आहेत या आशयाची तक्रार प्राप्त झाल्यानंतर माननीय जिल्हाधिकारी यांनी बीडीओ तसेच इतर अधिकारी यांना अहवाल मागितला सदरील अहवालावरून माननीय जिल्हाधिकारी परभणी यांनी सरपंच संजय साडेगावकर व पत्नी सदस्य महानंदा साडेगावकर यांना अपात्र केले होते.
सदर अपात्रतेच्या निकालाच्या नाराजीने संजय साडेगावकर व महानंदा साडेगावकर यांनी अँड.श्रीकांत जी कवडे यांच्यामार्फत माननीय विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांच्यासमोर कलम १६ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिन अधिनियम नुसार अपील दाखल केले होते सदरील अपिलावर अपिलार्तीचे म्हणणे तसेच तक्रारदार यांचे म्हणणे व शासकीय अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन माननीय विभाग आयुक्त यांनी आपली आपलिकेट श्री संजय साडेगावकर व महानंदा साडेगावकर यांच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय जिल्हाधिकारी परभणी यांचे आदेश रद्द केले व अपील मंजूर करून सरपंच संजय साडेगावकर यांचे सरपंच पद कायम केले.
सदरील प्रकरणात संपूर्ण परभणी जिल्ह्याचे लक्ष लागलेले होते शिवसेना माजी जिल्हाप्रमुख व माजी जिल्हा परिषद सभापती राहिलेल्या संजय साडेगावकर यांना मोठा दिलासा मानला जात आहे त्यांच्यातर्फे अँड.श्रीकांत जी कवडे यांनी काम पाहिले.

## गेवराई शहरात जोरदार पाऊस!

गेवराई । प्रतिनिधी
सकाळपासून शहरासह तालुक्यात कधी उन तर कधी ढगाळ वातावरण बघायला मिळत होते. दुपारनंतर वातावरणात प्रचंड उष्णताही वाढल्याचे जाणवत होते.दुपारनंतर ढगाळ वातावरण तयार होऊन विजांचा कडकडाट सुरु झाला अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. दुपारी ३ वाजेनंतर शहराच्या काही भागात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने एकच पळापळ झाली. घराबाहेर खरेदी करण्यासाठी बाहेर पडलेल्या नागरिकांचे अचानक आलेल्या पावसाने मोठ्या प्रमाणावर हाल झाले. ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाट सोबतच वाऱ्यासह गेवराई शहरात जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. दुपारी ०२वाजून ४० मिनिटांनी हा




पाऊस सुरू झाला.
शहरातील सर्व भागातील वीज पुरवठा पाऊस सुरू होताच खंडित झाला. वारा आणि जोरदार पाऊस सुरू असल्याने शहरवासीयांची धांदल उडाली. शहरात दिवसभर ढगाळ वातावरण राहिले, येथे नक्की चांगला पाऊस होईल असे वाटत असतानाच चांगला दणक्या पाऊस तब्बल तासन् तास सुरू राहीला होता वातावरणात बदल झाला बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झालाय. सुरुवातीला जोरदार असलेल्या पावसाने नंतर रिमझिम स्वरूप घेतले आणि सुमारे दोन तासाने थांबला. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडें कोसळले आहे. गेल्या काही दिवसापासून उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे उष्णतेचा त्रास असणाऱ्या नागरिकांना या पावसामुळे काहिसा दिलासा मिळाला आहे.

### अवकाळी पावसात वीज कोसळून सायगावात शेतकऱ्याचा मृत्यू, सुगावमध्ये म्हैस दगावली

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई तालुक्यात रविवारी दुपारी पाच वाजण्याच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या नैसर्गिक आपत्तेमुळे सायगाव व सुगाव या दोन ठिकाणी दुर्दैवी घटना घडल्या आहेत. सायगाव येथे वीज कोसळून दिगंबर गायकवाड (वय ५९) या



शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. गायकवाड हे शेतात काम करत असताना अचानक वीज कोसळल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली. तर दुसरीकडे, मौजे सुगाव येथील मोसिन सत्तार पठाण यांच्या शेतात वीज कोसळली. यामध्ये त्यांची एक म्हैस जागीच दगावली. या दोन घटनांमुळे तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन योग्य ती मदत तातडीने करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# बप्पा, आण्णा, भैय्या पवनचक्की कंपनीवाले पोलिस प्रशासनाच्या मदतीने शेतकऱ्यांवर खोटे खंडणीचे गुन्हे दाखल करू लागले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडुन पोलिस प्रशासनाकडून सशुल्क पोलिस संरक्षण या नावाखाली अक्षरशः दडपशाही सुरू असुन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असुन त्यांच्यावर खोटे खंडणीचे गुन्हे दाखल होत असुन आपण लोकप्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेऊन जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन व पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी यांना जाब विचारण्यात यावा तसेच पवनचक्की कंपन्यांकडुन होणारी शेतकऱ्यांची आर्थिक व मानसिक पिळवणूक प्रकरणी पिडीत शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी लोकसभा आणि विधानसभा सभागृहात आवाज उठवण्यात यावा अशी विनंती लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा प्रचार प्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी खा.बजरंग बप्पा सोनावणे, आ.सुरेश आण्णा धस आणि आ. संदिप क्षीरसागर यांना ईमेल द्वारे केली आहे.

खा.बजरंग बप्पा सोनावणे, मा.आ. सुरेश आण्णा धस, मा.आ.संदिप क्षीरसागर यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती करताना आपण लोकप्रतिनिधी आहात. आपण निवडणुकीच्या काळात सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या अडीअडचणी दुर करण्याचे आणि याविषयी सभागृहात आवाज उठविण्याचे आश्वासन दिले होते.

गेल्या वर्षभरापासून बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यानी उच्छाद मांडला असुन पोलिस प्रशासनाकडून सशुल्क संरक्षणाच्या गोंडस नावाखाली शेतकऱ्यांना दमदाटी करणे, त्यांना कोणतीही कल्पना न देता तसेच मावेजा न देताच त्यांच्या शेतातुन उच्च दाबाच्या विद्युत तारा ओढणे, काही ठिकाणी एकाच गावात वेगवेगळा मावेजा देणे, काही ठिकाणी न वटणारे धनादेश देणे तर काही ठिकाणी खोटे गुन्हे दाखल करू अशा धमक्या देणे सुरू होते. मात्र दि.०७.०५.२०२५ रोजी पाटोदा तालुक्यातील



दासखेड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बेडुकवाडी येथील शेतकरी बाप लेक शिवाजी बाजीराव शिंदे आणि बालाजी शिवाजी शिंदे यांनी त्यांच्या शेतातुन जाणाऱ्या विद्युत तारा ओढण्यास विरोध केल्यामुळे सुरूवातीला त्यांच्यावर ३०-४० लोकांचा जमाव जमवुन दडपण आणण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी त्याला दाद न दिल्याने त्यांच्या वर पाटोदा पोलिस स्टेशन मध्ये खंडणीचा खोटा गुन्हा दाखल केला आहे. अशाप्रकारे पोलिस प्रशासनाच्या मदतीने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवरील रझाकारी सुरू असुन शेतकरी दडपणाखाली आहे. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक बीड हे पवनचक्की कंपन्यांचे हस्तक असल्यासारखे वागत असुन पवनचक्की कंपन्यांची बाजु घेऊन शेतकऱ्यांना खोटे, गावगुंड, खंडणीखोर ठरवत आहेत. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक हे शेतकऱ्यांच्या लेखी तक्रारीकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे खा.बजरंग बप्पा सोनावणे आपण लोकसभेच्या सभागृहात आणि आ.सुरेश आण्णा धस व आ. संदिप क्षीरसागर आपण दोघांनीही विधानसभा सभागृहात शेतकऱ्यांवरील अन्याय प्रकरणी आवाज उठवुन त्यांना न्याय द्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

**विविध दैनिकात प्रकाशित बातम्यांची कात्रणे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पोलिस महासंचालक यांना निवेदनासह सादर**

लोकप्रतिनिधी खा.बजरंग सोनावणे, आ.सुरेश आण्णा धस, आ.संदिप क्षीरसागर यांना लेखी निवेदनासोबत बीड जिल्ह्यातील विविध दैनिकात विविध दैनिकात प्रकाशित बातम्यांची कात्रणे सोबत जोडली असुन हे निवेदन प्रतिलिपीत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पोलिस महासंचालक, विशेष पोलिस महानिरीक्षक परीक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांना पाठविण्यात आली आहेत.

**स्व.संतोष आण्णा देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी मोर्चे आणि मुलाखती मात्र पवनचक्की कंपन्यांकडून पिडीत शेतकऱ्यांबाबत गप्पच का ?**

खा.बजरंग बप्पा सोनावणे, आ.सुरेश आण्णा धस आणि आ.संदिप क्षीरसागर यांनी मस्साजोगचे सरपंच स्व.सौतोष आण्णा देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी मोर्चे काढले, विविध टीव्ही चॅनेलवर मुलाखती दिल्या मात्र बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे व पोलीस प्रशासनाच्या दडपशाहीमुळे दडपणाखाली असलेल्या शेतकऱ्यांना न्याय कोण मिळवुन देणार?? का शेतकरी फक्त मतदानापुरता मर्यादित आहे असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका

## बीड जिल्हयातील चार गुंडाची एकाच दिवशी एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन MPDA व MCOCA कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषपाने पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी । पो.नि. पो.स्टे. माजलगावं शहर यांनी दि. ०१.०४.२०२५ रोजी इसम नामे तारेख खान मुसा खान वय २८ वर्षे रा. फुलेनगर, माजलगावं (धोकादायक व्यक्ती) २. स.पो.नि. पो.स्टे. वडवणी यांनी दि. १८.०३.२०२५ रोजी इसम नामे विशाल माणिक डांबे वय २४ वर्षे रा. बाहेगव्हाण ता. वडवणी (धोकादायक व्यक्ती) ३. पो.नि. पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण यांनी दि. ०६.०३.२०२५ रोजी इसम नामे गजाजन सुभाष जाधव वय ३८ वर्षे रा. राडी तांडा ता. अंबाजोगाई (बुटलेगर) ४. पो. नि.पो.स्टे. शिवाजीनगर यांनी दि. ०९.०४.२०२५ रोजी इसम नामे गणेश भारत गिरी वय २३ वर्षे रा. इंद्रप्रस्थ कॉलनी, नगर रोड, बीड (धोकादायक व्यक्ती) यांचे विरुध्द चझऊ- कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्याचाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक योड यांच्या मार्फतीने मा. जिल्यदंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक। याचे विरुध्द पो.स्टे. माजलगांव शहर येथे जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, रस्ता आडवुण मारहाण करणे, चोरी करणे, गैर कायदयाची मंडळी जमविणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण जघ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचे वर इछडड १२६ प्रमाणे यापुर्वीच प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तसेच उपविभागीय दंडाधिकारी माजलगांव यांनी सदर इसमास यापुर्वी कलम ५६(१) मपोका प्रमाणे तडीपार केले होते.

सदर स्थानबध्द इसम क्रमांक २ याचे विरुध्द पो.स्टे. वडवणी येथे मारहाण करणे, मुलींची छेडछाड करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, गैर कायदयाची मंडळी जमविणे, जबरी चोरी करणे, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदवाचे उल्लंघन करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०५ गुन्हयाची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे वा करीता त्याचे वर उीझउ ११० प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती व पोलीस अधीक्षक बीड यांनी यापुर्वी सदर इसमास कलम ५५ मपोका प्रमाणे ०१ वर्षा करीता बीड जिल्हयाच्या हद्दीतुन हद्दपार केले होते. सदर स्थानबध्त इसम क्रमांक ३ याचे विरुध्द पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण येथे हातभट्टीची दारु तयार करणे, वाहतुक करणे, ताब्यात बाळगणे, बेकायदेशीररीत्या हातभट्टीच्या दारुची विक्री करणे, या व अशा स्वरुपाचे एकुण ०५ गुन्हयांची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले वर्तन सुधारावे या करीता त्याचे वर म.दा.का. चे कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती.

# निवडणुकीसाठी इच्छुकांचे गुडघ्याला बाशिंग!

## माजलगाव तालुक्यात विविध राजकीय पक्षांच्या मोर्चे बांधणीला वेग

पात्रुड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीनंतर आता नगर परिषदेसह जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या हालचालींना वेग आला आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या सत्तांतरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडूनच उमेदवारी मिळविण्यास इच्छुकांची पसंती आहे. असे असले तरी काही इच्छुकांनी अक्षरशः गुडघ्याला बाशिंग बांधले असून या निवडणुकांसाठी मोर्चे बांधणीला वेग आला आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा कालावधी संपून तब्बल ३ वर्षांहून अधिक काळ लोटला, मात्र निवडणुका न झाल्याने इच्छुकांची चांगलीच कुचंबना झाली होती. ओबीसी जनगणनेचा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मुद्दा निकाली लागला. त्यानुसार आगामी ४ महिन्यात या निवडणुका घेण्यासाठी शासकीय पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. ही माहिती सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचली. यादृष्टीने श्रेष्ठींकडून जय्यत तयारी सुरू करण्याचे आदेश त्यांना आले आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या काही काळात होणार आहेत. आमदारांकडून तरुणांना अपेक्षा माजलगाव तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रंगतदार होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.माजी मंत्री प्रकाश सोळंके यांनी यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रस्थापित उमेदवारांनाच उमेदवारी दिल्याने काही तरुण कार्यकर्ते नाराज आहेत यामुळे सोळंके यांना या तीनही निवडणुकांसाठी उमेदवारी देताना सतर्क रहावे लागणार आहे. दरम्यान जयसिंह सोळंके तरुण असल्याने ते या निवडणुकांमध्ये तरुणांना संधी देतील, अशी अपेक्षा तरुणवर्गाला आहे.

**मोहन जगताप झाले अधिक सतर्क !**

माजलगाव विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभाव मुळे छत्रपती सहकारी साखर कारखानाच्या चैरमन मोहनराव जगताप अधिक सतर्क झाले आहेत. शहरासह ग्रामीण भागातील तळागाळातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांपर्यंत प्रत्यक्ष संवाद साधण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. मागील काही दिवसांपासून ते गावोगावी दौरे करून माहिती जाणून घेत आहेत. विधानसभेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेत बदल होवू नये, याची पूर्णतः खबरदारी जगताप यांनी घेतली आहे. त्यादृष्टीने त्यांनी पूर्व तयारी सुरू केली आहे.त्यामुळे मोहन जगताप कडे उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या अधिक असणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# दहावीचा निकाल उद्या, राज्य मंडळाची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेच्या निकालाच्या तारखेची घोषणा करण्यात आली आहे. यंदा दहावीची परीक्षा दरवर्षीच्या तुलनेत लवकर घेण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थी पालकांचे निकालाच्या तारखेकडे लक्ष लागले होते. त्यानुसार यंदा दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी (१३ मे) जाहीर करण्यात येणार आहे.

राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्यभरातील सुमारे १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली आहे. यंदा परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे कॉपीच्या घटनांमध्ये घट झाली आहे. बारावीच्या परीक्षेचा निकाल दीड टक्क्याने घटलाअसताना दहावीचा निकाल वाढणार की घटणार याकडे विद्यार्थी, पालकांचे लक्ष लागले आहे.

# मस्साजोग येथील नदी खोलीकरण कामाची अ‍ॅड. देशमुख यांनी केली पाहणी

बीड । प्रतिनिधी

नाम फाउंडेशन मार्फत मस्साजोग येथील नदी खोलीकरणाचे काम चालू आहे. या कामाची पाहणी जन आंदोलनाचे विश्वस्त अ‍ॅड. अजित एम. देशमुख यांनी आज केली. काम चांगल्या पद्धतीने चालू असून नदीची खोली आणि रुंदी देखील चांगली असल्याने देशमुख यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. नाम फाउंडेशन मार्फत नदी खोलीकरणासाठी ड. अजित देशमुख यांनी मशीन उपलब्ध




करून दिल्यानंतर जवळपास तीन किलोमीटर परिसरातील नदीचे खोलीकरण होत आहे. या कामाने वेग घेतला असून यातून मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये देखील उत्साहाची वातावरण आहे.

नदी परिसरात फिरताना आज धनंजय देशमुख, भागवत कदम, तुषार देशमुख, सुदर्शन देशमुख, मनोज देशमुख यांच्यासह शेतकरी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कामाची गती आणखी वाढवून कामाचे प्रमाण देखील वाढवावे, असे यावेळी देशमुख यांनी म्हटले. या नदीपात्रात असलेले बंधारे आता मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवणार असल्यामुळे पावसाळयात शेतकऱ्यांच्या मनातील आनंद वृद्धिंगत होणार आहे. यातून पिकत नसलेली शेती आता पिकणार असल्यामुळे शेतकरी देखील समाधान व्यक्त करत होते.

# बीडचा कृष्णकुमार बाहेती बनला एआरटीओ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२३चा निकाल नुकताच जाहीर झाला. यात बीड येथील कृष्णकुमार प्रेमकिशोर बाहेती याची उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (एआरटीओ श्रेणी-१) या पदासाठी निवड झाली. पाच वर्षांपासून न खचता अथक प्रयत्नांतून त्याने हे यश प्राप्त केले. कृष्णकुमार बाहेतीचे शालेय शिक्षण संस्कार विद्यालयात झाले. बालपणापासून स्कॉलरशिप, नवोदय आणि ऑलिम्पियाडसारख्या अनेक परीक्षा दिल्या. स्वा. सावरकर महाविद्यालयात शिक्षण घेताना बारावीत प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर बारावीत प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर अंबाजोगाईच्या म. बसवेश्वर कॉलेजमध्ये पूर्ण केले. खासगी



कंपनीमध्ये संधी उपलब्ध होती. परंतु सनदी अधिकारी होण्याचे त्याचे स्वप्न होते. कृष्णकुमारने यूपीएससी-एमपीएससी परीक्षा देण्याचा निर्धार केला व थेट दिल्ली गाठून अभ्यास सुरू केला. २०२२ मध्ये झालेल्या एमपीएससी वनसेवा परीक्षेत त्याने ९६ वा क्रमांक पटकावला; पण अधिकारी होण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. २०२३ मध्ये एमपीएससी राज्यसेवा परीक्षेत १०९ वा क्रमांक पटकावत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी एआरटीओ श्रेणी-१ पदासाठी पात्र ठरला. ही परीक्षा दरवर्षी ३ लाख विद्यार्थी देतात आणि त्यातून ३०० विद्यार्थी निवडले जातात. सध्या कृष्णकुमार सिरसाळा येथे ग्राम महसूल अधिकारी म्हणून कार्यरत आहे.

**अनेकदा निराश; पण ऊर्जा मिळत राहिली**

२०१८ पासूनच्या प्रवासात मी अनेक वेळा निराश झालो; पण आई-वडिलांची इच्छा त्यांचे पाठबळ, शिक्षक आणि मित्रांचे प्रोत्साहन, मेहनत यातून पुन्हा नवीन ऊर्जा निर्माण व्हायची. या परीक्षेसाठी अभ्यास करण्याचे स्थळ, वेळ, माध्यम यापेक्षा आपण उत्तीर्ण होऊ शकतो, असा आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. परीक्षेसाठी कठोर मेहनतीशिवाय संयम, चिकाटी आवश्यक आहे.

**कृष्णकुमार बाहेती, बीड**

पान १ वरून...

## एसपी नवनीत कॉवत यांच्या कारवाया कौतुकास्पद...

चर्चा सध्या रंगत आहे. तसेच या पोलीस ठाण्याच्या ठाणे प्रमुख यांच्या रायटर कडून मटका चालवणाऱ्यांकडून वसुली करत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. आणि बीड एलसीबीची कारवाई थंडवली असून अनेक एलसीबी चेक कर्मचारी मटका माफिया यांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात आहे.

शहरात राजरोसपणे मटका चालत आहे. अनेक चौकाचौकात मटका फोफावत चालला आहे. मटका खेळणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कामगारांना मटका खेळण्यास प्रवृत्त करणाऱ्या बुकिंकडून लाखों रूपयांची उलाढाल होताना दिसत आहे. मटका जुगार घेणारे त्यांना प्रोत्साहन करत आहेत का? आकडे लावणाऱ्या लोकांचे टोळकेदेखील या मटका अड्ड्याच्या ठिकाणी फिरताना दिसत आहेत. मटका जुगार खेळणाऱ्या बुकीकडून दिवसभरात लाखो रूपयांची उधळपट्टी होत आहे. यामध्ये सर्वात जास्त फोन मटका चालविला जात आहे. फोनमार्फत आकडे लावणे आणि फोनवरच पैशाची बोली लावणे असे प्रकार चालू आहेत. शहरातील प्रमुख चौकात चौकात व नामांकित गल्लीबोळात मटक्याचे बुके राजवस्तरपणे चालू आहेत. अवैध मटका चालवणाऱ्यांवर पोलीस प्रशासन कारवाई का? करत नाही. याची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

बीड शहरात सध्या जोरात मटका सुरू आहे. या अवैध धंद्याबाबत पोलिस प्रशासन गप्प असुन, यातून मोठी कमाई मिळत असल्यानेच अवैध धंद्याविरोधात कारवाई करण्यास पोलीस टाळाटाळ करतात. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पोलीस खात्याची यंत्रणा एकदा स्वच्छ धुऊन काढणं गरजेचं आहे. अवैध धंदे पुन्हा सूरू होताना दिसत आहे. बीड शहरातील चौका-चौकांत मटका अड्डे खुलेआम सुरू आहेत. नागरिकांनी ओरड असतानाही पोलिसांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने मटका अड्डे कुणाच्या आश्रयाने सुरू आहेत याबाबत शंका उपस्थित होत आहे. त्यामुळे मटका अड्ड्यांविरोधात पोलिसांच्या कारवाईचे केवळ फार्सच ठरणार का? अशी शंका उपस्थित होत आहे. बीड शहरात अवैध धंदे बंद होतील अशी अपेक्षा होती. मात्र तसेच होताना दिसून येत नाही. शहरात खुलेआम मटका धंदा सुरु आहे. यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होत आहे. याकडे पोलिसांनी त्वरित लक्ष देऊन असे अवैध धंदे बंद करावे अशी मागणी आता बीड शहरातील नागरिकांकडून होऊ लागली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT